SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES ISSN: 2349-4766 (P), 2278-8808 (E)

*कडलग सुवर्णा उत्तमराव & प्रा. डॉ. भोसले आर. डी. (1527-1530)*

# अहमदनगर जिल्हाच्या आर्थिक विकासात ग्रामपंचायतींची भुमिका

**कडलग सुवर्णा उत्तमराव & प्रा. डॉ. भोसले आर. डी.**

*एस. एम. बी. एस. टी. कॉलेज, संगमनेर जि. अ. नगर*

*एम. जी. व्ही. कला व वाणीज्य महाविदयालय येवला जि. नाशिक*

**प्रस्तावणाः -** अहमदनगर जिल्हातील ग्रामपंचायती आणि गांवाचे आणि गांवाचे प्रमाण लक्षात येते. गांवाचे प्रमाण १५८५ असले तरी देखील आजही काही गांवे निर्जन आहे. त्या ठिकाणी मनुष्य वस्ती नाही. तर काही गावामध्ये गट ग्रामपंचायती आहेत. गट ग्रामपंचायती असणा-या गावांचे प्रमाण २१९ आहे. म्हणजेच आजही जवळजवळ ४० टक्के गावाची लोकसंख्या ६०० पेक्षा कमी आहे. अशा लोकांना ग्रामपंचायत कार्यालयासाठी इतर गावामध्ये जावे लागते. तर १४ तालुक्यातील ७ तालुक्याची नमुना निवडपध्दतीने अभ्यासासाठी निवड केलेली आहे. त्यामध्ये निर्मलग्राम पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतीच्या निकश समोर ठेवुन ग्रामपंचायती अभ्यासासाठी निवडण्यात आलेली आहेत. १४ तालुके ४ विभागलेली आहे. श्रीरामपुर, संगमनेर, कर्जत, नगर अशी विभागणी झालेली असुन नगर व श्रीरामपुर तालुक्यात प्रत्येक ४ तर कर्जत व संगमनेर तालुक्यात प्रत्येकी ३ तालुके कार्यरत आहेत.

1 **ग्रामपंचायत प्रमाण ः -** महाराष्ट्राचा गतीमानतेत सामाजिक क्षेत्र आणि पायाभुत सुविधा यांना विशेष स्थान आहे. आर्थिक विकास घडवुन आणण्यासाठी दुर्वल घटकांना प्रतिकुल परिस्थितीत असणा-या अपंगांना व भेदभाव वागवले जाणा-या खालच्या स्तरांतील लोकांना मदत करण्याच्या हेतु सरकारने केंद्रबिंदु मानला आहे. या विकासाठी शिक्षण, आरोग्य कुटुंवकल्याण काम करण्याची क्षमता या घटकांना प्राधान्य देवुन ग्रामीण विकास हेच ध्येय शासन समोर ठेवते आहे. यातुन ग्रामीण लोकांचे आरोग्य व्यवस्थीत ठेवणे. त्यांना गावात शिक्षणाची संधी मिळवुन देणे. पिण्याच्या पाण्याची सोय करणे. अल्पभुधारक लोकांना काम मिळवुन देणे शेतक-यांना विविध स्वरूपाचे अनुदान देणे हा ग्रामपंचायतीचा उद्देश आहे. अहमदनगर जिल्हयातील ग्रामपंचायती अनेक पुरस्कार प्राप्त आहेत. ग्रामीण विकासात ग्रामपंचायतीचा मोलाचा वाटा आहे. त्यामुळे गावातील अपंग, वृध्द, निरक्षर, महिला अशा अनेक लोकांना गावातच अनेक गुप ग्रामपंचायतींची विभागणी होवुन स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन केल्या आहेत. त्या कारणाने गावतील जनतेला गावातच पाणीपटटी घर महसुल जमा करता येवु लागला अनेक कागदपत्राची पुर्तता गावातच होत आहे. जिल्हात १४ तालुके आहेत प्रत्येक तालुक्यात ५० पेक्षा जास्त ग्रामपंचायती कार्यरत आहे. अहमदनगर जिल्हात १३११ ग्रामपंचायती आहेत तर २५७ गट ग्रामपंचायती आहेत. एकुन लोकसंख्या विचारात घेता (४०८८०००) शहरी भागात १९.८९ लाख लोकसंख्या शहरी भागात तर ग्रामीण भागात २०.९९ लाख लोकसंख्या वास्तव्य करते. म्हणजेच ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण जास्त आहे. त्याचप्रमाणे स्थलांतरणाचे प्रमाण